महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १६४ वे | दिनांक : ०९/०६/२०२६ | वार : मंगळवार

## १५६ पैकी निम्म्याच लोकांवर कारवाई का? : इतर ७८ जण आमदार, खासदारांचे मुलं होती का? - रोहिणी खडसे



**पुणे** : आळंदी-मरकळ रोडवरील तुळापूर येथील एका खासगी बंगल्यात सुरू असलेल्या हाय-प्रोफाइल रेव्ह पार्टीवर गुन्हे शाखेच्या पथकाने रविवारी पहाटे २:३० वाजता धडक छापा टाकला. 'प्रोजेक्ट एक्स' नावाने आयोजित या बेकायदेशीर पार्टीतून पोलिसांनी तब्बल १०७ तरुण आणि ४९ तरुणींना ताब्यात घेतले आहे. यावरून राष्ट्रवादी कांग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी टीका केली आहे.

रोहिणी खडसे म्हणाल्या, पुण्याजवळच्या तुळापूर येथे एका पार्टीवर पुणे पोलिसांनी छापा टाकला. पार्टीत तब्बल १५६ लोक सहभागी असताना फक्त ७८ जणांवरच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यातही फक्त २९ जणांची टेस्ट करण्यात आली. मला आठवतेय प्रांजल यांच्या प्रकरणात चार - पाच लोक एकत्र जमले होते. त्याला पुणे पोलिसांनी 'रेव्ह पार्टी'चे नाव दिले होते. आता १५६ लोक सापडली त्याला 'हाऊस पार्टी' म्हणत आहेत.

प्रांजल यांच्यासह सर्वांना ताब्यात घेण्यात आले होते व सर्वांची टेस्ट करण्यात आली होती. मग आता पुणे पोलिस १५६ लोकांपैकी इतर ७८ लोकांवर इतकी का मेहरबान झाली? फक्त ७८ लोकांवर कारवाई केली मग इतर ७८ लोकांना का सोडण्यात आले? फक्त २९ लोकांचीच का टेस्ट करण्यात आली? असा सवाल उपस्थित करत यातून पुणे पोलिसांचा दुटप्पीपणा दिसत असल्याची टीका रोहिणी खडसे यांनी केली आहे.

तसेच पुढे रोहिणी खडसे म्हणाल्या, इतर लोकांना सोडले ते काय आमदार, खासदारांचे मुलं होती का? की हाय प्रोफाइल लोक होती जी सरकारला मदत करतात? पोलिस सांगत आहेत की या पार्टीची परवानगी घेण्यात आली होती पण परवानगीचा एक साधा पेपर दाखवला जात नाही. ना अद्याप कारवाईचा एखादा व्हिडिओ समोर आला आहे. प्रांजल यांच्या प्रकरणात व्हिडिओ बाहेर पाठवले जात होते. मीडियाला माहिती पुरवून मीडिया ट्रायल चालवला जात होता. पुणे पोलिसांना कोण तरी चावी देतो तसे पुणे पोलिस वागत आहे का? असाही प्रश्न खडसे यांनी उपस्थित केला आहे.

रोहिणी खडसे म्हणाल्या, सर्वात पहिले तर छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मृतीस्थळ असलेल्या तुळापूरात या पार्टीची परवानगी दिलीच कशी गेली आणि तेही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनी! याचा खुलासा मा. गृहमंत्र्यांनी करायला हवा, असे आवाहन त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना केले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसचा वर्धापन दिन सोहळा पुढे ढकलला



**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा यंदाचा २७ वा वर्धापन दिन एका दिवसाने पुढे ढकलण्यात आला असून, आता हा सोहळा गुरुवार, ११ जून रोजी दुपारी २ वाजता मुंबईतील किंग्ज सर्कल येथील षण्मुखानंद सभागृहात पार पडणार आहे. दरवर्षी १० जून रोजी साजरा होणाऱ्या या पक्षीय सोहळ्याच्या तारखेत नवी दिल्लीत 'एनडीए'ची एक महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आल्याने बदल करण्यात आला आहे, अशी अधिकृत माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पक्षाची स्थापना १० जून १९९९ रोजी झाली असली तरी, यंदा याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीत 'एनडीए' घटक पक्षांची तातडीची बैठक बोलावली आहे. या बैठकीला देशभरातील 'एनडीए'चे सर्व प्रमुख घटक पक्ष, त्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि खासदार उपस्थित राहणार आहेत. महायुती आणि 'एनडीए'चा एक महत्त्वाचा भाग असल्याने या राष्ट्रीय बैठकीला उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे हे १० जून रोजी दिल्लीतील बैठकीसाठी उपस्थित राहणार आहेत.

याबाबत माहिती देताना सुनील तटकरे म्हणाले, देशातील जनतेने सलग तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी आणि एनडीएला देशसेवेची संधी दिली आहे. जगभरात युद्धाचे सावट असतानाही भारताने केलेली प्रगती आणि एनडीए सरकारच्या मागील दोन वर्षांच्या पूर्ततेचा आढावा या बैठकीत घेतला जाईल. तसेच एनडीएच्या भक्कम एकसंघ वाटचालीचे मंथन या बैठकीत होणार आहे. दिल्लीतील बैठक पूर्ण करून सर्व नेते परतल्यानंतर, ११ जून रोजी दुपारी २ वाजता षण्मुखानंद सभागृहातच हा सोहळा होईल. केवळ तारखेत बदल झाला असून जागा तीच आहे, असे तटकरे यांनी स्पष्ट केले आहे.

सुनील तटकरे म्हणाले, माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर पक्ष पहिल्यांदाच आपला वर्धापन दिन साजरा करत आहे. अजित पवारांच्या निधनानंतर अतिशय संयमाने आणि धिरोदत्तपणे पक्षाची धुरा सांभाळत सुनेत्रा पवारांनी राष्ट्रीय अध्यक्षपद आणि राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली आहेत. हा वर्धापन दिन 'दादांना समर्पण... संघर्ष आणि संकल्प' या विचाराने साजरा केला जाणार, अशी माहिती तटकरे यांनी दिली आहे.

संघटनात्मक बांधणीबाबत बोलताना सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले की, २०२९ च्या आगामी मोठ्या आव्हानांना पक्षाला 'एनडीए'चा घटक म्हणून ताकदीने सामोरे जायचे आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ५० टक्के आरक्षणाबाबतच्या निर्णयानंतर राज्यातील प्रलंबित जिल्हा परिषद निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान होण्याची दाट शक्यता असल्याने, राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांचा राज्यव्यापी दौरा लवकरच नियोजित करण्यात येत आहे. या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, बूथ पातळीपासून ते थेट देशपातळीपर्यंत पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक भक्कम करण्यावर आणि पक्ष विस्तारावर आमचे सर्वोच्च प्राधान्य असेल, असेही तटकरे यांनी यावेळी नमूद केले.

## अजित पवारांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य भोवले : नगरसेवक किशोर मासाळांची राष्ट्रवादीतून हकालपट्टी



**बारामती** : नगर परिषदेतील राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक किशोर मासाळ यांनी दिवंगत नेते अजित पवार यांच्याविषयी नुकतेच एक आक्षेपार्ह वक्तव्य केले. या वक्तव्याचे तीव्र पडसाद उमटले असून, राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्यांच्या सहयोगी पक्षाच्या सर्व नगरसेवक-नगरसेविकांनी या घटनेचा कडक शब्दांत निषेध नोंदवला आहे. तसेच, या प्रकरणी किशोर मासाळ यांनी आपल्या नगरसेवक पदाचा तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करणारे एक स्वाक्षरीयुक्त निवेदनही तयार करण्यात आले. दरम्यान, या गंभीर प्रकाराची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी किशोर मासाळ यांची पक्षातून अधिकृतरीत्या हकालपट्टी केल्याची घोषणा केली आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर सर्व नगरसेवकांनी एकत्र येत 'सहयोग' या निवासस्थानी जाऊन दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करत त्यांना विनम्र अभिवादन केले. त्यानंतर, किशोर मासाळ यांच्यावर कारवाई आणि त्यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे सह्यांचे निवेदन सुनेत्रा पवार यांचे विशेष कार्यकारी अधिकारी सचिन यादव यांच्याकडे अधिकृतपणे सुपूर्द करण्यात आले.

अजितदादा पवार यांच्याबद्दल करण्यात आलेले वक्तव्य बारामतीकरांच्या भावना दुखावणारे असल्याची तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत सर्व नगरसेवकांनी या घटनेचा कडक शब्दांत निषेध नोंदवला. 'अशा अपमानास्पद वक्तव्यांना जनतेचे कधीही समर्थन मिळणार नसून, संबंधित नगरसेवकावर त्वरित कठोर कारवाई करावी आणि त्यांच्याकडून राजीनामा घेण्यात यावा,' अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्ष श्वेता नाळे, गटनेते संजय संघवी, उपगटनेते संपदा चौधर आणि प्रतोद विशाल हिंगणे यांच्यासह सभापती अमर धुमाळ, नवनाथ बल्लाळ, जयसिंग देशमुख, सविता जाधव व मनीषा चव्हाण तसेच नगरसेवक जय पाटील, विष्णुपंत चौधर, बिरजू मांढरे, अभिजीत चव्हाण, अभिजीत जाधव, अविनाश निकाळजे, अनुप्रिता डांगे-तांबे, रुपाली मलगुंडे, प्रवीण माने, धनश्री बांदल, भारती शेळके, प्रसाद खारतोडे, पूनम चव्हाण, मनिषा बनकर, सारिका वाघमारे, मंगल किर्वे, मंगल जगताप, गोरख पारसे, शर्मिला ढवाण, अल्ताफ सय्यद, अश्विनी सातव, राजेंद्र सोनवणे, प्रतिभा खरात, अफ्रिन बागवान, दर्शना तांबे, निलेश इंगुले, सोमनाथ गजाकस, अमोल कावळे, गणेश जोजारे आणि राहुल वाघोलीकर आदींच्या स्वाक्षऱ्या असलेले निवेदन देण्यात आले.

दुसरीकडे, आपल्या राजीनाम्यासाठी रोहित पवार यांची सोशल मीडिया टीम बारामतीत सक्रिय असल्याचा आरोप किशोर मासाळ यांनी केला आहे. 'पक्षाच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार आणि जय पवार यांनी अद्याप माझ्याकडे राजीनाम्याची कोणतीही मागणी केलेली नाही. तसेच माझा राजीनामा मागण्याचा अधिकार स्थानिक तालुकाध्यक्ष किंवा शहराध्यक्षांना नाही, असे स्पष्ट करत आपण नगरसेवक पदाचा राजीनामा देणार नसल्याची ठाम भूमिका मासाळ यांनी मांडली आहे.

दरम्यान, पत्रकार परिषद घेत किशोर मासाळ यांनी केलेल्या चुकीच्या वक्तव्याबद्दल माफी मागितली आहे. ते म्हणाले, चार दिवसांपूर्वी माझी एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली. त्या ऑडिओ क्लिपमध्ये माझ्याकडून स्वर्गीय अजितदादा पवार साहेब यांच्याबद्दल एक चुकीचे वक्तव्य गेले. सुरुवातीलाच मी याबद्दल अजितदादा यांचे सर्व कुटुंबीय, समस्त बारामतीकर आणि अजितदादांवर प्रेम करणारे महाराष्ट्रातील तमाम जनतेचे हात जोडून माफी मागतो.

पुढे बोलताना किशोर मासाळ म्हणाले, माझ्याकडून निघालेले वक्तव्य नक्कीच चुकीचे आहे. त्याबद्दल मला पश्चाताप होत आहे. याबद्दल बारामतीकरांच्या भावना तीव्र आहेत. परंतु, माझ्या या वक्तव्याच्या आडून राजकारण होत आहे. सदर घटनेत मला पश्चाताप झाला असून त्याचे प्रायश्चित्त म्हणून मी उद्या (दिनांक ९) रोजी सकाळी ८.४५ पासून स्वर्गीय अजितदादा यांच्या अपघात घटनास्थळी एक दिवसाचा अन्नत्याग करून आत्मक्लेश करणार आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड., एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०९ जून २०२६


# डॉ. प्रभाकर शेळके यांना वैशाखी वादळवारा पुरस्कार



**जालना :** जिल्ह्यातील कवी कथाकार नाट्यलेखक बालसाहित्यिक डॉ प्रभाकर शेळके यांच्या "डबल ढोलकी" या समकालीन वास्तवाचे सम्यक चित्रण असलेल्या कथासंग्रहास पुणे येथील वैशाखी वादळवारा संस्थेचे अध्यक्ष ग्रामीण कवी कथाकार चंद्रकांत जोगदंड यानीकाल दिनांक सात जूनला पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष श्रीपाल सबनीस होते.तर चंद्रकांत जोगदंड यांच्या शुभहस्ते चि. दुर्गेश प्रभाकर शेळके यांनी पुरस्कार स्वीकारला. त्यांच्या या यशाबद्दल सुनील लोणकर,कवी कैलास भाले, प्रा.पंढरीनाथ सारके, विनोद जैतमहाल कृष्णा कदम, गणेशभाऊ खरात, सुहास पोदार, राजेंद्र देशमुख, कुलदिप रुचे, विठ्ठल घोडके, नामदेव शेळके, अनिरुद्ध पावसे, राम कंटुले गणेश ढाकणे सुनील पवार परेश पवार पुजा विश्वनाथ गायकवाड, रामभाऊ शेळके, रामदास भारुडकर सुखदेव सपकाळ देवराव सोनवणे अँड पंडीत पाचारे इ.अभिनंदन केले

## संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी अर्ज करावेत

**बीड (भगवंत पाळवदे) :** ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी समाजकल्याण विभागाने पुढाकार घेतला आहे. समाजकल्याण कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यातील संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तरी पात्र आणि इच्छुक विद्यार्थ्यांनी ऊसतोड कामगारांच्या पाल्यांनी अर्ज करावेत तसेच वसतिगृहाशी संपर्क साधून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांनी केले आहे. बीड जिल्ह्यातील एकूण १० तालुक्यांमध्ये मिळून २० शासकीय वसतिगृहे सध्या पूर्ण क्षमतेने कार्यान्वित आहेत. यामध्ये बीड, माजलगाव, केज, पाटोदा, परळी वैजनाथ, गेवराई, आष्टी, धारूर, वडवणी आणि अंबाजोगाई या ठिकाणी प्रत्येकी २ वसतिगृह चालविले जातात. या सर्व वसतिगृहांची एकूण प्रवेश क्षमता २ हजार विद्यार्थ्यांची असून, यामुळे दुर्गम भागातील ऊसतोड कामगारांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणाचा मार्ग सुकर होणार आहे.प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना निवास आणि भोजनाची व्यवस्था मोफत दिली जाईल. शालेय वह्या, पुस्तके आणि स्टेशनरीचे विनामूल्य वाटप करण्यात येईल. जिल्हा पातळीवरील विद्यार्थ्यांना दरमहा ६०० रुपये, तर तालुका पातळीवरील विद्यार्थ्यांना दरमहा ५०० रुपये भत्ता थेट दिला जाईल. मुख्य अट: विद्यार्थ्यांचे आई-वडील अधिकृत ऊसतोड कामगार असणे आवश्यक आहे.

चालू शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी वरील यादीतील आपापल्या तालुक्याच्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहाच्या ठिकाणी थेट संपर्क साधून आपले अर्ज सादर करावेत, असेही समाजकल्याण विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त उपवर्गीकरण विरोधात मुंबईत धडकणार महामोर्चा




**छत्रपती संभाजीनगर : रि**पब्लिकन सेनेच्या वतीने सरसेनानी आनंदराज आंबेडकर साहेबांच्या नेतृत्वाखाली राज्यातील अनुसूचित जातीच्या सुमारे 35 प्रतिनिधींच्या उपस्थितीत पार पडलेल्या उपवर्गीकरणविरोधी संघर्ष परिषदेतून अनुसूचित जातीत फूट पडण्याच्या मनुवादी कारस्थान विरोधात आंदोलनाचे रणशिंग फुंकले असून 26 जून रोजी मुंबई येथे महामोर्चा धडकणार असल्याचे जाहीर करण्यात आले.केंद्र व राज्य सरकारने देशात फोडा आणि राज्य करा नीती अवलंबलेली असून जाती-जातीत भांडणे लावून देशाला एकसंध ठेवणाऱ्या महापुरुषांच्या विचारांना तिलांजली देण्याचा

सरकारचा डाव आम्ही यशस्वी होऊ देणार नाही अशी एकजुटीची हाक देत हजारोंच्या उपस्थितीत ही परिषद पार पडली.रिपब्लिकन सेनेतर्फे आयोजित या परिषदेसाठी राज्यभरातून अनुसूचित जाती प्रवर्गातील ३५ हून अधिक जातीचे प्रतिनिधी व विचारवंत आणि अभ्यासक उपस्थित होते. यावेळी आनंदराज आंबेडकर म्हणाले की, परिषदेच्या निमित्ताने आम्ही एकत्र आलो असून आता समाजासाठी एकत्र राहणार आहोत. एका जातीतील काही लोकांना फूस लावून उपवर्गीकरणाचा घाट घातला जातोय उपवर्गीकरण ही सरकार विरोधात संघर्षाची नांदी ठरणार आहे. सरकारची मानसिकता आरक्षण संपविण्याची आहे हे विषारी मनसुबे आम्ही यशस्वी होऊ देणार नाही एकजुटीने लढू असा निर्धार व्यक्त करण्यात आला.माजी सामाजिक न्यायमंत्री आ. राजकुमार बडोले, माजी मंत्री आ. बबनराव घोलप, अभ्यासक प्रा. ह. नी. सोनकांबळे, प्रा.संदेश वाघ, साहित्यिक गंगाधर ढवळे, सत्यशोधक समाज महासंघाचे लक्ष्मीकांत शिंदे, राष्ट्रीय चर्मकार समाजाचे रोहिदास बनसोडे, ढोर समाजाचे नेते अशोक पाटेकर, परसराम इंगोले, प्रा. युवराज धसवडीकर, होलार समाजाचे नेते प्रा. एम.एम. सुरनर, देवानंद वानखेडे, कंकय्या समाजाचे नेते बाबा कांबळे, समता शिक्षक संघटनेचे अरुण जाधव, अभ्यासक प्रा. संदेश वाघ, इंजि. विश्वदीप करंजीकर, विवेक बनसोडे, रितेश चौधरी, किशोर जोहरे, डॉ.गणेश बोरकर, प्रा.गोपाल बछिरे आदींनी आपले विचार मांडले.तर अमन आंबेडकर, डॉ.अविनाश शिंदे, किरण घोंगडे, कपिल सरवदे, यांची विशेष उपस्थिती होती.यावेळी परिषदेने घेतलेल्या ठरावाचे वाचन करण्यात आले त्यास उपस्थित आणि प्रमुख वक्ते यांनी हात उंचावून अनुमोदन दिले.ठराव पुढील प्रमाणे- ■ अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण रद्द करावे, उपवर्गीकरणासाठी नेमलेली बदर समिती तात्काळ बरखास्त करून अहवाल फेटाळून लावावा.■ आरक्षणाची 100% अंमलबजावणी करावी, रिक्त आरक्षित पदे तातडीने भरावीत■ अनुशेष भरण्यासाठी विशेष भरती मोहीम राबवावी■ डी-रिझर्वेशन प्रक्रिया तात्काळ थांबवावी■ रोस्टर प्रणाली पारदर्शक करावी■ शिक्षण, शिष्यवृत्ती व संशोधन संधी वाढवाव्यात■ खाजगीकरणामुळे कमी होत असलेल्या आरक्षण संधींवर नियंत्रण आणावे■ संसद आणि विधानसभेत आरक्षण अंमलबजावणीवरील वार्षिक श्वेतपत्रिका सादर करावी■ संविधानातील सामाजिक न्यायाच्या तत्त्वांनुसार अनुसूचित जातीचे हक्क अबाधित ठेवावेत.■ शासकीय, निमशासकीय, विद्यापीठ आणि सार्वजनिक क्षेत्रातील सर्व रिक्त आरक्षित पदे तातडीने भरावीत.■ खाजगी आणि सहकार क्षेत्रात, खाजगी-अभिमत विद्यापीठात आरक्षण धोरण लागू करा.■ खुल्या प्रवर्गातुन केलेल्या नौकर भरतीची श्वेतपत्रिका काढण्यात यावी■ संसद आणि विधानसभेत आरक्षण अंमलबजावणीवरील वार्षिक श्वेतपत्रिका सादर करावी. ■ मा. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करणे आणि त्यांना क्रिमी लेअर लावणे याबाबत दिलेला असंवैधानिक निर्णय पूर्णपणे रद्द करणारे विधेयक संसदेत मंजूर करण्यात यावे;■ भारतीय संविधानातील प्रतिनिधीत्वाच्या तत्त्वानुसार संसदेने आरक्षण कायदा पारित करून खासगी क्षेत्रात सर्व स्तरांवर आरक्षण लागू करावे आणि या कायद्याचा समावेश संविधानाच्या नवव्या अनुसूचीमध्ये करावा;■ घटनात्मक तरतूद आणि आरक्षण कायदा असतानाही महाराष्ट्र शासनाने ७ मे २०२१ रोजी बेकायदेशीररीत्या शासन निर्णय निर्गमित करून पदोन्नतीतले बंद केलेले आरक्षण तात्काळ सुरू करावे;■ शासकीय आणि सार्वजनिक सेवा, उद्योगांचे खासगीकरण आणि ठेकेदारी पद्धती बंद करावी;■ शिक्षण हा क्षेत्राचे राष्ट्रीयीकरण करून के. जी. पासून पी. जी. पर्यंत प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मोफत शिक्षणाची जबाबदारी शासनाने घ्यावी;■ राज्य शासनातील सर्व प्रकारची भरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात यावी.यावेळी प्रास्ताविक डॉ.सुशील सूर्यवंशी यांनी केले अमोल विजयानंद जाधव यांनी एकतेचे कुंपण बांधा हे गीत सादर करून एकजुटीचे आवाहन केले,कपिल सरवदे यांनी ठराव वाचन केले, सचिन निकम यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन करून आभार मानले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चंद्रकांत रुपेकर, प्रा.सिद्धोधन मोरे, काकासाहेब गायकवाड, मिलिंद मोकळे, अनिल मगरे, के व्ही मोरे, विजय शिंदे, अजय बनसोडे, राहुल कानडे, गुलाब जाधव, मनीषा साळुंखे, राहुल गवळी, सुनील पांडे, प्रा.विजय घोरपडे, अस्कर खान, धम्मापाल भुजबळ, विकास हिवराळे, राजू मगरे, अनिल खरात, असजद खान, प्रवीण शिंदे, गणेश रगडे, प्रा.प्रबोधन बनसोडे, कुणाल भालेराव, बाळू गायकवाड, बालाजी सोनवणे, तुषार अवचार, अतुल चव्हाण, हनुमंत भाले, आशितमुनी गर्जे, पांडुरंग मगर, किरण मगरे, सौरभ मोरे, सम्यक त्रिभुवन, विनोद वाकोडे, के व्ही मोरे, सचिन शिंगाडे, संजय सातपुते, बाळा बनसोडे, राजा बाबू बनसोडे, राजू हिवराळे आदींनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०९ जून २०२६


## लिची

लाल लाल लिची
किती छान दिसते
फळांच्या दुकानात
घोसामध्ये सजते

आकाराने लहान
खडबडीत अंग
चवीला आंबट गोड
आकर्षक रंग

मधूर रसरशीत
फळ आरोग्यदायी
खाणारा माणूस
गुण तिचे गाई

उन्हाळ्यात उष्णतेपासून
बचाव करते
नैसर्गिक थंडावा
आपणास देते

सर्वांनी खावे
गोड लिची फळ
उत्साह वाढतो
अंगी येते बळ



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## पेरणीसाठी तयार रहा!

मृग नक्षत्राच्या आगमनाने,
प्रभाकराचा चढला पारा.
वारा वादळाचा अचानक,
होणार सोसाट्याचा मारा. १

वारा वादळ देणार आहे,
वरुण राजाला हो वर्दी.
शेतकरी बांधवांनो आता,
शेतामध्ये करा तुम्ही गर्दी. २

पावशा पक्षी सांगत आहे,
पेरणीसाठी तयार रहा!
शेतकरी दादा चला चला,
पेरण्याची वेळ आली पहा! ३

मृगाच्या पहिल्या धारा पडता,
रानात पसरला सुगंध सारा.
ढेकूळ ढेकूळ विरघळताच,
आनंदाने वाहू लागला वारा. ४

पहा मृगधारेच्या आगमनाने,
बाप पेरणीची तयारी करतो
हर्ष उल्हासाने बळीराजा,
आनंदाने शेतीची ओटी भरतो. ५



**नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## धाराशिव/लातूर/बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या अनुषंगाने महायुती पदाधिकारी यांची बैठक संपन्न



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** दि.७ रोजी धाराशिव जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाच्या सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व सहकाऱ्यांची बैठक पार पडली. विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीमध्ये उपस्थितांशी भारतीय जनता पक्ष, शिवसेना,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, महायुती चे अधिक्रत उमेदवार माजी मंत्री बसवराज पाटिल यांनी संवाद साधला व विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी विधान परिषद निवडणुकीसाठी पक्षाच्या नियोजनाबाबत, संघटनात्मक बांधणी, प्रचाराची दिशा तसेच कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्यांबाबत विचारमंथन करण्यात आले. उपस्थित सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विजयासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास महायुती च्या पदाधिकारी यांनी व्यक्त केला.यावेळी बैठकीला माजी मंत्री व आमदार राणाजगजित सिंह पाटील, जिल्हाध्यक्ष दत्तात्रय कुलकर्णी, माजी आमदार सुरजितसिंह ठाकूर, तुळजा भवानी साखर कारखान्याचे चेअरमन सुनील चव्हाण, मुरूमचे नगराध्यक्ष बापूराव (काका) पाटील, उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण भैय्या पाटील, समरजितसिंह ठाकूर, भाजप प्रदेश सदस्य अँड. अनिल काळे, मराठवाडा संयोजक नितीन काळे, अनुसूचित जाती जिल्हाध्यक्ष दिलीप भालेराव, नळदुर्ग नगराध्यक्ष बसवराज धरणे, धाराशिव नगराध्यक्षा सौ. नेहाताई राहुल काकडे, तुळजापूर नगराध्यक्ष विनोद गंगणे, जिल्हापरिषद बांधकाम सभापती सिद्धेश्वर कोरे, पंचायत समिती सभापती सौ. गोकर्णाताई कदम, सौ. अस्मिताताई कांबळे, माजी नगराध्यक्ष मधुकरराव तावडे, विठ्ठल साई सह सा.कारखान्याचे संचालक रामकृष्णपंत खरोसेकर, माणिकराव राठोड, जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष कैलास शिंदे, सौ. प्रितीताई कदम यांच्यासह धाराशिव जिल्ह्यातील सर्व मंडळाध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरपालिका व नगरपंचायत नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासकीय वसतिगृहातील प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**बीड (भगवंत पाळवदे) :** मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या मागास, दिव्यांग व अनाथ प्रवर्गातील मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी समाजकल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. तरी चालू शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पात्र विद्यार्थ्यांनी mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन समाजकल्याण सहाय्यक आयुक्त प्रदीप भोगले यांनी केले आहे. बीड जिल्ह्यात मुलांसाठी ६ आणि मुलींसाठी ७ अशी एकूण १३ शासकीय वसतिगृहे सुरू आहेत. या सर्व वसतिगृहांची एकूण प्रवेश क्षमता १ हजार १९० एवढी आहे. या ठिकाणी इयत्ता ८ वी ते पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग, दिव्यांग आणि अनाथ विद्यार्थी या प्रवर्गातील असावा. वसतिगृहात प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व भोजनासह शैक्षणिक साहित्य मोफत तसेच जिल्हास्तरावरील विद्यार्थ्यांना १,३०० रुपये तर तालुकास्तरावरील विद्यार्थ्यांना १,००० रुपये दरमहा भत्ता बँक खात्यात दिला जाईल. इच्छुक विद्यार्थ्यांनी mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरायचे आहेत. शालेय स्तरावरील विद्यार्थी दि. ३० जून तर अकरावी, बारावी व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या उमेदवारांसाठी १५ जुलै २०२६ ही अंतिम तारीख राहील. असेही समाजकल्याण विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०९ जून २०२६

# धरती आबा बिरसा मुंडांचा अमर वारसा



भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा विविध संघर्ष, त्याग, बलिदान आणि जनआंदोलनांनी समृद्ध झालेला इतिहास आहे. या इतिहासात अनेक महान नेत्यांनी आपल्या कार्याने आणि विचारांनी अमिट ठसा उमटविला आहे. तथापि, दीर्घकाळ भारतीय इतिहासलेखनाच्या मुख्य प्रवाहात काही अशा व्यक्तिमत्त्वांकडे तुलनेने कमी लक्ष दिले गेले, ज्यांनी आपल्या समाजासाठी आणि देशासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये बिरसा मुंडा यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि अस्तित्वासाठी संघर्ष करणारे बिरसा मुंडा हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे, सामाजिक परिवर्तनाचे आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे प्रतीक होते. आदिवासी समाज त्यांना प्रेमाने आणि आदराने "धरती आबा" म्हणजेच "धरतीचे पिता" म्हणून संबोधतो. ९ जून हा त्यांचा स्मृतिदिन असून हा दिवस केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा नसून आदिवासी समाजाच्या अस्मितेचा, संघर्षाचा आणि स्वाभिमानाचा गौरव करण्याचा दिवस आहे.एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारत ब्रिटिश सत्तेच्या जोखडाखाली होता. इंग्रजांनी आपल्या प्रशासनिक आणि आर्थिक धोरणांच्या माध्यमातून भारतीय समाजातील विविध घटकांवर प्रभाव टाकला. या धोरणांचा सर्वाधिक विपरीत परिणाम आदिवासी समाजावर झाला. जंगल, जमीन आणि जल यांवर आधारित जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचे अस्तित्वच धोक्यात आले. ब्रिटिशांनी वनकायदे लागू करून जंगलांवरील आदिवासींचे पारंपरिक हक्क नाकारले. महसूल व्यवस्थेमुळे त्यांच्या जमिनींवर कर लादले गेले. सावकार, व्यापारी आणि जमीनदार यांच्या संगनमताने आदिवासींच्या जमिनी बळकावल्या जाऊ लागल्या. परिणामी हजारो आदिवासी कुटुंबे आपल्या पारंपरिक उपजीविकेपासून वंचित झाली. त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर गंभीर परिणाम झाला. अशा कठीण परिस्थितीत आदिवासी समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले.१५ नोव्हेंबर १८७५ रोजी आजच्या झारखंड राज्यातील उलिहातू या गावात बिरसा मुंडा यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सुगना मुंडा आणि आई करमी हातू हे सामान्य आदिवासी कुटुंबातील कष्टकरी होते. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांच्या कुटुंबाला वारंवार स्थलांतर करावे लागत असे. अशा परिस्थितीत वाढलेल्या बिरसा यांना लहानपणापासूनच श्रम, संघर्ष आणि वास्तव जीवनाचा परिचय झाला. बालपणीच त्यांच्यामध्ये नेतृत्वाचे गुण आणि तीक्ष्ण निरीक्षणशक्ती दिसून येत होती. निसर्गाशी असलेले त्यांचे नाते अतिशय घट्ट होते. जंगल, डोंगर, नद्या आणि ग्रामीण जीवन यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल प्रभाव पडला.बिरसा यांनी प्राथमिक शिक्षण स्थानिक शाळेत घेतले. पुढे त्यांना जर्मन मिशन शाळेत शिक्षण घेण्याची संधी मिळाली. शिक्षणामुळे त्यांच्या विचारविश्वाला नवी दिशा मिळाली. त्यांनी समाजातील विषमता, अन्याय आणि शोषण यांचे बारकाईने निरीक्षण केले. मिशनरी शिक्षणाच्या काळात त्यांना आधुनिक शिक्षणाचा परिचय झाला, परंतु त्याचवेळी त्यांनी आपल्या समाजाच्या सांस्कृतिक परंपरांचे महत्त्वही जाणले. शिक्षणामुळे त्यांच्यात चिकित्सक दृष्टिकोन विकसित झाला. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, अशिक्षण आणि व्यसनाधीनतेची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच ब्रिटिश सत्तेच्या धोरणांमुळे आदिवासी समाजावर होणाऱ्या परिणामांचाही त्यांनी अभ्यास केला.त्या काळात आदिवासी समाज अनेक समस्यांनी ग्रस्त होता. आर्थिक शोषण, सामाजिक उपेक्षा, अशिक्षण आणि अंधश्रद्धा यांमुळे समाजाची प्रगती खुंटली होती. बिरसा यांनी ओळखले की समाजाच्या उन्नतीसाठी सर्वप्रथम सामाजिक जागृती आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले. त्यांनी लोकांना मद्यपान, जादूटोणा, अंधश्रद्धा आणि इतर सामाजिक कुरीतींपासून दूर राहण्याचे आवाहन केले. त्यांनी स्वच्छता, शिक्षण, शिस्त, नैतिकता आणि परिश्रम यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि प्रेरणादायी विचारांमुळे हजारो लोक त्यांच्या सभांमध्ये सहभागी होऊ लागले.बिरसा मुंडा हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते एक धार्मिक जागृतीचे प्रणेतेही होते. त्यांनी आदिवासी समाजाला त्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक मुळांशी जोडण्याचा प्रयत्न केला. त्या काळात विविध धर्मप्रचारक संस्थांचा आदिवासी भागांमध्ये प्रभाव वाढत होता. अनेक आदिवासी आपली पारंपरिक ओळख गमावण्याच्या स्थितीत होते. बिरसा यांनी आदिवासी संस्कृती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचे संरक्षण करण्यासाठी चळवळ उभारली. त्यांनी एकेश्वरवादाचा संदेश दिला आणि नैतिक जीवन जगण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या अनुयायांमध्ये एक नवीन धार्मिक-सामाजिक चेतना निर्माण झाली. पुढे ही चळवळ "बिरसाईत" म्हणून प्रसिद्ध झाली.बिरसा यांच्या विचारांचा प्रभाव झपाट्याने वाढू लागला. लोक त्यांना केवळ समाजसुधारक म्हणून नव्हे, तर एक आध्यात्मिक नेता म्हणूनही पाहू लागले. त्यांच्या सभांमध्ये हजारो लोक सहभागी होत. त्यांनी लोकांमध्ये आत्मसन्मान आणि आत्मविश्वास निर्माण केला. त्यांनी सांगितले की कोणताही समाज आपल्या हक्कांसाठी जागरूक झाला तर त्याला कोणीही गुलाम बनवू शकत नाही. त्यांच्या संदेशामुळे आदिवासी समाजात एक नवीन जागृती निर्माण झाली.दरम्यान, ब्रिटिश सत्तेच्या धोरणांमुळे आदिवासींच्या समस्या अधिकच वाढत होत्या. जंगलांवरील निर्बंधांमुळे त्यांची उपजीविका धोक्यात आली होती. जमीनदार आणि सावकार यांच्या शोषणामुळे अनेक कुटुंबे कर्जबाजारी झाली होती. आदिवासींना त्यांच्या स्वतःच्या जमिनीवर मजूर म्हणून काम करावे लागत होते. या परिस्थितीने बिरसा यांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण झाला. त्यांनी ओळखले की सामाजिक सुधारणांसोबतच राजकीय संघर्षही आवश्यक आहे. म्हणून त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून अन्यायाविरुद्ध लढण्याचे आवाहन केले.याच काळात बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली "उलगुलान" या ऐतिहासिक चळवळीची सुरुवात झाली. "उलगुलान" म्हणजे महान क्रांती किंवा महान उठाव. ही चळवळ आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि स्वातंत्र्यासाठी उभारलेली व्यापक लोकचळवळ होती. बिरसा यांनी "अबुआ दिशुम, अबुआ राज" म्हणजे "आपला देश, आपले राज्य" हा संदेश दिला. या घोषणेमध्ये स्वराज्याची बीजे दडलेली होती. त्यांनी आदिवासींना अन्यायकारक कर भरण्यास नकार देण्याचे आणि आपल्या जमिनींचे रक्षण करण्याचे आवाहन केले.१८९५ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे त्यांना अटक केली. त्यांना कारावासाची शिक्षा झाली. परंतु तुरुंगवासामुळे त्यांच्या लोकप्रियतेत घट झाली नाही. उलटपक्षी, त्यांचे विचार अधिक व्यापक प्रमाणात लोकांपर्यंत पोहोचले. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी नव्या जोमाने चळवळीला सुरुवात केली. त्यांनी आदिवासी समाजाला अधिक संघटित केले आणि ब्रिटिशांविरुद्ध संघर्षाची तयारी केली.१८९९ आणि १९०० या काळात उलगुलान चळवळ आपल्या शिखरावर पोहोचली. हजारो आदिवासी बिरसा यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सत्तेविरुद्ध उभे राहिले. अनेक ठिकाणी सरकारी यंत्रणांविरुद्ध प्रतिकार करण्यात आला. शोषण करणाऱ्या जमीनदारांविरुद्ध संघर्ष उभारण्यात आला. या उठावामुळे ब्रिटिश प्रशासन हादरून गेले. आदिवासी समाजाची एकजूट आणि त्यांची संघर्षशक्ती पाहून ब्रिटिश सरकार चिंतेत पडले.उलगुलान चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ राजकीय बंड नव्हती. ती सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मुक्तीची चळवळ होती. आदिवासी समाजाला त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांची जमीन वाचविणे आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे हे तिचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात या चळवळीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.ब्रिटिश सरकारने या उठावाचे दमन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लष्करी कारवाई केली. अनेक आदिवासींना अटक करण्यात आली. अनेकजण संघर्षात शहीद झाले. अखेर ३ फेब्रुवारी १९०० रोजी बिरसा मुंडा यांना अटक करण्यात आली. त्यांना रांची कारागृहात ठेवण्यात आले. कारागृहात असताना त्यांची प्रकृती खालावत गेली. ९ जून १९०० रोजी अवघ्या पंचविसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले. अधिकृत नोंदींनुसार त्यांचा मृत्यू कॉलऱ्यामुळे झाला असे सांगण्यात आले. तथापि, त्यांच्या मृत्यूबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. त्यांच्या अकाली निधनामुळे आदिवासी समाजाला मोठा धक्का बसला, परंतु त्यांच्या विचारांची ज्योत मात्र विझली नाही.बिरसा मुंडा यांचे जीवन हे प्रेरणेचा अखंड स्रोत आहे. त्यांनी अत्यंत कमी वयात आपल्या समाजाला नवी दिशा दिली. त्यांनी आदिवासी समाजात स्वाभिमानाची भावना जागवली. अन्यायाविरुद्ध लढण्याचे धैर्य दिले. त्यांनी दाखवून दिले की संघटित समाज कोणत्याही शोषणकारी व्यवस्थेला आव्हान देऊ शकतो. त्यांच्या नेतृत्वामुळे आदिवासी समाजाला स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव झाली. त्यांच्या संघर्षाचा परिणाम पुढील काळात विविध धोरणांमध्ये दिसून आला. ब्रिटिश सरकारला आदिवासी प्रश्नांकडे गांभीर्याने पाहावे लागले. छोटानागपूर टेनन्सी कायद्यासारख्या उपाययोजनांमुळे आदिवासी जमिनींच्या संरक्षणासाठी काही प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे बिरसा मुंडा यांचे योगदान केवळ एका आंदोलनापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा दीर्घकालीन प्रभाव पडला.स्वातंत्र्यानंतर भारताने सामाजिक न्याय आणि समतेच्या दिशेने अनेक पावले उचलली. आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. तरीही आज अनेक आदिवासी समुदाय दारिद्र्य, अशिक्षण, बेरोजगारी, आरोग्यविषयक समस्या आणि विस्थापन यांसारख्या आव्हानांना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत बिरसा मुंडा यांचे विचार आणि कार्य अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला आत्मसन्मान, संघटन आणि स्वावलंबनाचा संदेश आजही मार्गदर्शक आहे.आजच्या काळात पर्यावरणसंवर्धन आणि शाश्वत विकास यांविषयी जगभर चर्चा होत आहे. आदिवासी समाजाची जीवनशैली आणि निसर्गाशी असलेले त्यांचे नाते हे शाश्वत विकासाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. बिरसा मुंडा यांनी जंगल, जमीन आणि जल यांचे महत्त्व ओळखले होते. त्यांचा संघर्ष हा पर्यावरणीय न्यायाचाही संघर्ष होता. त्यामुळे आधुनिक पर्यावरणीय विचारसरणीतही त्यांच्या कार्याचे विशेष महत्त्व आहे.आज भारत सरकार आणि विविध राज्य सरकारांनी बिरसा मुंडा यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या नावाने विद्यापीठे, संग्रहालये, विमानतळ, शैक्षणिक संस्था आणि संशोधन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जाणारा 'जनजातीय गौरव दिवस' हा आदिवासी समाजाच्या योगदानाचा राष्ट्रीय गौरव करणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. यामुळे नवीन पिढीला त्यांच्या कार्याची ओळख होत आहे.बिरसा मुंडा यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या जीवनाचा आणि कार्याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी दिलेला संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. सामाजिक न्याय, समानता, स्वाभिमान, पर्यावरणसंवर्धन आणि सांस्कृतिक अस्मिता यांची मूल्ये जपणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. आदिवासी समाजाच्या विकासासाठी संवेदनशीलतेने कार्य करणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या संस्कृतीचा सन्मान करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.९ जून हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की स्वातंत्र्य, समानता आणि न्याय यांसाठीचा संघर्ष कधीही व्यर्थ जात नाही. बिरसा मुंडा यांनी पेटवलेली स्वाभिमानाची ज्योत आजही लाखो लोकांच्या हृदयात तेवत आहे. त्यांनी दाखवून दिले की संघर्षातून परिवर्तन घडवून आणता येते आणि आत्मविश्वासाच्या बळावर कोणतीही गुलामी झुगारून देता येते. म्हणूनच ते केवळ इतिहासातील एक व्यक्ती नाहीत, तर एक विचार आहेत, एक प्रेरणा आहेत आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे शाश्वत प्रतीक आहेत.धरती आबा बिरसा मुंडा यांचे जीवन भारतीय इतिहासातील तेजस्वी पर्व आहे. त्यांचा संघर्ष, त्याग, नेतृत्व आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश येणाऱ्या पिढ्यांना सतत प्रेरणा देत राहील. आदिवासी स्वाभिमानाचे हे महानायक, स्वातंत्र्याचे अमर सेनानी आणि सामाजिक न्यायाचे अखंड दीपस्तंभ म्हणून त्यांचे नाव भारतीय जनमानसात सदैव अजरामर राहील. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त या महान विभूतीस विनम्र अभिवादन करताना त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि न्याय्य, समताधिष्ठित व मानवतावादी समाज घडविण्याचा संकल्प करूया. हाच त्यांना वाहिलेला खरा श्रद्धासुमनांचा हार ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०९ जून २०२६



प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


## "नाती "

नाती जपली जीवापाड,
माणसे मात्र तोलत राहिली,
माझ्या कष्टांच्या प्रत्येक थेंबाला,
स्वार्थाची किंमत लावत राहिली.

मी दिले ते कर्तव्य समजून,
त्यांनी घेतले हक्क मानून,
जेव्हा अपेक्षांचा डोंगर वाढला,
तेव्हाच उभा राहिलो स्वत:ला जाणून.

आता नाही तक्रार कुणाची,
नाही कुणाविषयी खंत,
स्वार्थी चेहऱ्यांच्या गर्दीतही,
जपेन मी स्वाभिमान अनंत.

पैशांनी माणसे जोडतात,
मनांना जोडू शकत नाहीत,
कर्तृत्व, प्रामाणिकपणा आणि माणुसकी,
यांच्याशिवाय नाती टिकत नाहीत,

माझ्या घामाच्या थेंबांना,
हिशोबाचे मोल मिळाले;
मन शोधत राहिले प्रेम
मला स्वार्थाचे चेहरे दिसले.

पैसे पाहून नाती जोडणारे,
काळ आल्यावर दूर जातात;
कर्तृत्व आणि स्वाभिमान असलेले,
एकटे असले तरी उंच उभे राहतात.

माझ्या खिशात काय आहे,
हे जगाला जाणून घ्यायचे असते;
पण माझ्या मनात काय चालले आहे,
हे विचारायला कुणाला वेळ नसतो.

गरज असेपर्यंत आपलेपणा,
गरज संपली की परकेपणा;
काही नाती रक्ताने जोडली जातात,
तर काही फक्त स्वार्थाने बांधली जातात.

मी बदललो नाही कधी,
फक्त माणसे ओळखायला शिकलो;
स्वार्थाच्या गर्दीत उभा राहून,
स्वाभिमानाने जगायला शिकलो.



डॉ. बाळासाहेब लिहिणार


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


# बसवराज पाटील यांनी घेतली गायकवाड व चौगुले यांची भेट



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : धाराशिव, लातूर, बीड ,विधान परिषदेचे महायुतीचे उमेदवार माजी मंत्री तथा लातूर ग्रामीण भाजपाचे जिल्हा अध्यक्ष बसवराज पाटील यांनी (दि.८)रोजी माजी खासदार प्रा. श्री. रवींद्रजी गायकवाड सर व माजी आ.शिवसेना उपनेते मा.ज्ञानराजजी चौगुले यांच्या निवासस्थानी घेतली सदिच्छा भेट.यावेळी धाराशिव जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा सौ. उषाताई रवींद्र गायकवाड, उमरग्याचे नगराध्यक्ष श्री. किरणजी रविंद्र गायकवाड व त्यांच्या पत्नी यांनी, आत्मीयतेने स्वागत करून विधान परिषद उमेदवारीबद्दल शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी प्रा. रवींद्रजी गायकवाड यांच्याशी राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती, सामाजिक प्रश्न, स्थानिक विकासाची दिशा तसेच जनहिताच्या विविध विषयांवर सविस्तर व सकारात्मक चर्चा माजी मंत्री बसवराज पाटिल यांनी केले.यावेळी आष्टा (जहागीर) ग्रामपंचायतीचे उपसरपंच बापुराव मोहनराव गायकवाड, अशोक पतगे, दिलीपजी भालेराव, बळीराम मामा सुरवसे, भास्कर शिंदे, प्रकाश आष्टे, बळीराम मामा सुरवसे, महेश पाटील, संदीप चौगुले आदी उपस्थित होते

# महात्मा फुले कर्जमाफी लाभार्थी शेतकऱ्यांनाही २ लाखांपर्यंत संपूर्ण कर्जमाफी द्या!



**बुलढाणा (महेश मुंढे)** : राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला असला, तरी यापूर्वी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना या योजनेतून वगळण्यात आल्याने त्यांच्यावर अन्याय होत असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. या शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी सिंदखेडराजा येथील शेतकरी प्रतिनिधींनी केली आहे.आज दि ८ जून रोजी यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय अधिकारी प्रा संजय खडसे यांच्या मार्फत यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, २०१९ नंतर अनेक शेतकऱ्यांनी शेतीच्या कामांसाठी पुन्हा कर्ज घेतले. मात्र, सततची नापिकी, अतिवृष्टी, दुष्काळी परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती, वाढलेला उत्पादन खर्च आणि शेतमालाला न मिळालेला योग्य दर यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. परिणामी अनेक शेतकऱ्यांची थकबाकी एक ते दोन लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे.सध्याच्या शासन निर्णयानुसार महात्मा फुले कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच कर्जमाफी मिळणार आहे. त्यामुळे दोन लाख रुपयांची थकबाकी असलेल्या शेतकऱ्याला उर्वरित दीड लाख रुपये भरल्यानंतरच ५० हजार रुपयांचा लाभ मिळणार आहे. आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी ही अट पूर्ण करणे कठीण असल्याने अनेक शेतकरी प्रत्यक्ष लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.शेतकरी प्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली की, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ चा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमाफी मंजूर करण्यात यावी. शेतकऱ्यांमध्ये भेदभाव न करता सर्व पात्र लाभार्थ्यांना समान न्याय मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.यावेळी शेतकरी योद्धा कृती समितीचे संस्थापक बालाजी सोसे, लोकजागर परिवारचे विश्वस्त प्रवीण गीते, प्राचार्य डी. आर. चव्हाण, गुलाबराव राठोड, कैलास भुमकर, राजू देशमुख, विष्णू घुगे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. दरम्यान, शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन कर्जमाफीच्या निर्णयात सुधारणा करावी, अन्यथा शेतकरी आंदोलनाचा मार्ग स्वीकारतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला. शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून मुक्त करून त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी उपस्थितांनी केली.